# पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय

## प्रेस नोट दि ०५/०७/२०२२

**अंमली पदार्थ विरोधी पथकाने सिनेस्टाईल पद्धतीने व धाडसाने ६० लाख रुपये किंमतीचा २१० किलो ९१२ ग्रॅम वजनाचा गांजा हा अंमली पदार्थासह आंतरराज्य गांजा तस्करी करणारी सराईत टोळी केली जेरबंद.**

पिंपरी चिंचवड शहरामध्ये चोरुन व लपुनछपुन होणारी गांजा या अंमली पदार्थाची विक्री, साठवणुक व वाहतुकीस पुर्णपणे प्रतिबंध व्हावा करीता **मा. पोलीस आयुक्त श्री अंकुश शिंदे** यांनी सुचना दिल्या होत्या त्यानुसार मा.सहाय्यक पोलीस आयुक्त, गुन्हे श्री. पद्माकर घनवट व वरिष्ठ पोलीस निरीक्षक, अंमली पदार्थ विरोधी पथक, श्री सतीश पवार यांनी वेळोवेळी अंमली पदार्थ विरोधी पथक, गुन्हे शाखेतील पोलीस अधिकारी व अंमलदार यांना सुचना दिल्या व मार्गदर्शन केले होते.

त्याप्रमाणे दि ०४/०७/२०२२ रोजी वपोनि श्री सतीश पवार यांचे सुचनेप्रमाणे स्वतः वपोनि सतीश पवार, सपोनि प्रशांत महाले व पोउपनि राजन महाडीक यांचे अधिपत्याखालील तीन वेगवेगळी पथके अंमली पदार्थाची तस्करी करणारे रेकॉर्डवरील आरोपीत यांना चेक करण्याकरीता चाकण पोलीस स्टेशन हद्दीमध्ये पेट्रोलींग करीत मौजे कोळीए गावचे हद्दीत भालसिंगवाडी येथे आले असतांना **पोलीस अंमलदार संदिप पाटील, प्रदिप शेलार व अशोक गारगोटे** यांना त्यांचे बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, एक मारुती सुझुकी कंपनीची पांढरे रंगाची आरटीओ क्र एमएच४३/व्ही/३७८८ असलेली फोर एक्स फोर गाडीमधुन गांजा हा अंमली पदार्थ विक्री करण्याकरीता भालसिंगवाडी येथे येणार आहेत. त्यांनी सदरची बातमी वपोनि पवार यांना सांगितली असता वरप्रमाणे तयार करण्यात आलेली तीन पथके सदर गाडीचा शोध घेणे कामी पेट्रोलींग करीत असताना भालसिंगवाडी कडुन चाकण-वांद्रे रोडकडे जात असताना सपोनि महाले यांचे पथकासमोरुन बातमीचे वर्णनातील गाडी पास झाली लागलीच सपोनि महाले यांनी त्यांचे गाडीचे मागुन येणारे सरकारी गाडीतील वपोनि पवार यांना सदर गाडी पास झाले बाबत सांगितले असता त्यांनी लागलीच सरकारी गाडी थांबवुन त्यांचे पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी सदरची संशयीत गाडी समोरुन येतांना पाहिल्यावर **थांबण्याचा इशारा केला असता गाडीचे ड्रायव्हर सुरवातीला थांबवुन नंतर गाडीसमोर जात असलेले पोलीस अंमलदार संदिप पाटील यांचे अंगावर गाडी घालुन जिवे मारण्याचा प्रयत्न करुन गाडीसह पळुन जावु लागला.** परंतु रस्ता कच्चा व अरुंद असल्याने व रत्यामध्ये समोर सरकारी गाडी उभी असल्याने ड्रायव्हरला त्या दिशेने गाडी नेता आली नाही. त्याचवेळी सपोनि महाले हे सुध्दा त्याचेकडील गाडीसह सदर संशयीत गाडीचे मागेच असल्याने त्यांचे गाडीतील **पोलीस अंमलदार अशोक गारगोटे यांनी लगेच चलाखीने त्या संशयीत गाडीचे ड्रायव्हरचे बाजुने पळत जावुन ड्रायव्हर बाजुचा दरवाजा उघडुन गाडीची चावी काढुन गाडी बंद करण्याचा प्रयत्न केला असता त्या गाडीचे ड्रायव्हरने गाडी रिव्हर्स मध्ये घालुन रत्याचे कडेला असलेल्या सिमेंटचे खांबाला गाडीचा दरवाजा जोरात घासुन गाडी रस्त्याचे खाली साधारण २० मिटर रिव्हर्समध्ये जोरात पोलीस अंमलदार अशोक गारगोटेसह घेवुन बाजुला असलेल्या खडयामध्ये पलटी केली.** गाडी पलटी झाल्याने वपोनि पवार, सपोनि महाले, पोउपनि महाडीक व सोबतचे सर्व पोलीस अंमलदार गाडीचे दिशेने पळत जात असताना त्या गाडीमधुन गाडीचा ड्रायव्हरने बाहेरपडुन पळ काढण्याचा प्रयत्न केला असता त्यास सोबतचे पोलीस अंमलदार यांनी शिताफिने पाठलाग करुन ताब्यात घेतले. गाडीमध्ये अडकुन पडलेले पोलीस अंमलदार अशोक गारगोट यांना व इतर दोन जणांना बाहेर काढुन ताब्यात घेण्यात आले.

ताब्यात घेण्यात आलेल्या इसमांना त्यांचे नाव व पत्ता विचारुन पळुन जाण्याचे कारण विचारले असता त्यांनी त्यांची नावे **१. गणेश कैलास चव्हाण, वय २५ वर्षे, रा. तलाठी ऑफीस जवळ, पाटेठाण. पो. राहु ता. दौड जि.पुणे (वाहन चालक) २. विकास विलास चव्हाण, वय २० वर्षे, रा. मु.चिंचोलवाडी पो. गोरेगांव ता. मानगांव जि. रायगड (वाहन चालकाच्या बाजुस बसलेला) ३. संजय रामदास पवार, वय २७ वर्षे, रा. खेडले झुंगे ता. निफाड जि. नाशिक ह.मु..पो. तलाठी ऑफीस जवळ, पाटेठाण. पो. राहु ता. दौड जि.पुणे (मागील बाजुस बसलेला) अशी असल्याचे** सांगितले. त्यांना पळुन जाण्याचे कारण विचारले असता त्यांनी उडवाउडवीची उत्तरे दिली. त्यांचे गाडीची झडती घेतली असता गाडीचे डीकीमध्ये गांजा हा अंमली पदार्थ असलेले १२ मोठे पुडे/पाकिटे व ४० लहान पुडे/पाकिटे एकुण ५२ लहान मोठे पुडे/पाकिटे मिळुन आले.

**अ.क्र. १ ते ३ यांना सदरचे पाकिटांबाबत अधिक तपास केला असता त्याचेकडे असलेली चारचाकी गाडी हि इसम नामे ४. गणेश महेश जगनाडे रा. भालसिंगवाडी ता. खेड. जि.पुणे याची असल्याचे सांगुन त्याची आई नामे ५. राणी महेश जगनाडे व ६. सचिन गणपत आवळे यांचे सांगणेवरुन त्यांचेकडुन पैसे घेवुन विशाखापट्टणम येथील अण्णा नावाचे इसमाकडुन गांजा हा अंमली पदार्थ विकत आणला असल्याचे समोर आले. तसेच त्यांनी १५ दिवसापुर्वी देखिल १२० किलो गांजा आणल्याचे तपासात निष्पन्न झाले. लागलीच अ.क्र. ४ ते ६ यांना ताब्यात घेणेकामी पोलीस अंमलदार यांना पाठविले असता अ.क्र. ४ नामे गणेश महेश जगनाडे रा. भालसिंगवाडी ता. खेड. जि.पुणे यास ताब्यात घेण्यात आले आहे. तसेच आज दिनांक ०५/०७/२०२२ रोजी अ.क्र. ०५ राणी महेश जगनाडे व ६. सचिन गणपत आवळे यांना ताब्यात घेवुन चाकण पोलीस स्टेशन येथे ताब्यात देण्यात आले आहेत.**

Scanned with CamScanner

अ.क्र. १ ते ४ यांचेकडुन ५२ लाख ७२ हजार ८०० रुपये किंमतीचा २१० किलो ९१२ ग्रॅम वजनाचा गांजा हा अंमली पदार्थ, ६० हजार रुपये किंमतीचे ०४ मोबाईल, ५ लाख ५० हजार रुपये किंमतीची गुन्हयामध्ये वापरण्यात आलेली गाडी असा एकुण ५९ लाख ०२ हजार ८०० रुपये किंमतीचा माल जप्त करण्यात आला आहे.

आरोपी १ ते ६ यांचेविरुध्द चाकण पोलीस स्टेशन गु.र.क्र. १०९३/२०२२ एन.डी.पी.एस. ॲक्ट कलम ८(क),२०(ब)(ii)(क),२९ व भादवी कलम ३०७, ३३२, ३५३, २८९ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असुन दाखल गुन्हयाचा तपास चाकण पोलीस स्टेशन करीत आहेत.

आरोपी नामे गणेश कैलास चव्हाण, संजय रामदास पवार, राणी महेश जगनाडे व सचिन गणपत आवळे यांचेवर यापुर्वी अंमली पदार्थ विरुध्दचे गुन्हे दाखल असुन ते सराईत गुन्हेगार आहेत.

सदरची कामगिरी ही मा.पोलीस आयुक्त, श्री अंकुश शिंदे सो. मा.अपर पोलीस आयुक्त डॉ. संजय शिंदे सो., मा.पोलीस उपायुक्त, गुन्हे, डॉ काकासाहेब डोळे सो., मा.सहाय्यक पोलीस आयुक्त, गुन्हे-१, श्री. पद्माकर घनवट सो. यांचे मार्गदर्शनाखाली अंमली पदार्थ विरोधी पथक, गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री सतीश पवार, सपोनि श्री प्रशांत महाले, पोउपनि श्री राजन महाडीक व पोलीस अमंलदार बाळासाहेब सुर्यवंशी, जिलाणी मोमीण, प्रदिप शेलार, राजेंद्र बांबळे, संतोष दिघे, संदिप पाटील, मनोज राठोड, अनिता यादव, प्रसाद कलाटे, विजय दौंडकर, प्रसाद जंगीलवाड, अशोक गारगोटे, पांडुरंग फुंदे, राजेंद्र शेटे, नागेश माळी, पोपट हुलगे यांनी केली आहे.

(डॉ काकासाहेब डोळे)
पोलीस उप आयुक्त, गुन्हे
पिंपरी चिंचवड

Scanned with CamScanner